LatestLaws.com

Helping Good People Do Good Things

# JUDICIARY EXAMS QUESTION PAPER

**Free Downloadable Formats**

Hello Good People!

LatestLaws.com

# Maharashtra Judicial Service

**Mains Examination, 2010**

**Question Paper**

LatestLaws.com

दिवाणी न्यायाधीश (क.स्त.) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग)
मुख्य परीक्षा - २०१०

ATM

2010 परीक्षा दि. १८ डिसेंबर, २०१०

२०१०

# PAPER – I
# पेपर क्रमांक – १

## Civil Procedure Code, Transfer of Property Act, Specific Relief Act, Law of Contracts, Sale of Goods Act and Partnership Act

## सिव्हील प्रोसिजर कोड, ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट, स्पिसीफिक रिलीफ ॲक्ट, लॉ ऑफ कॉन्ट्रक्ट्स, सेल ऑफ गुड्स ॲक्ट व पार्टनरशिप ॲक्ट

**Time : 3 Hours** | **Max. Marks : 100**
**वेळ : ३ तास** | **गुण : १००**

**N.B. :**
**सूचना :**

*(1) All questions are compulsory.*
*(१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*

*(2) Question No. 1 carries 20 marks. All other questions carry equal marks i.e. 16 marks each.*
*(२) प्रश्न क्रमांक १ ला २० गुण असून उर्वरित सर्व प्रश्नांना समान म्हणजेच १६ गुण आहेत.*

*(3) Your answers must be to the point and wherever possible quoting the specific provision of law will be appreciated.*
*(३) उत्तरे मुद्देसुद असावीत. आवश्यक तेथे कायद्यातील योग्य तरतुदींचा वापर स्वागतार्ह ठरेल.*

*(4) Do not reproduce any question. Write only question's number against the answer.*
*(४) उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्न पुन्हा लिहू नयेत. फक्त प्रश्न क्रमांक नमूद करुन उत्तर लिहावे.*

*(5) Number of optional question up to the prescribed number in the order in which questions have been solved, will only be assessed and excess answers of the question/s will not be assessed.*
*(५) ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात त्या क्रमाने अपेक्षित प्रश्नसंख्येइतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरित अतिरिक्त ठरणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

P.T.O.

LatestLaws.com

(6) *"Other than cited cases, candidate should not write roll number, any names (including their own), signature, address or any indication of their identity anywhere inside the answer book otherwise he will be penalised."*

(६) *"उदाहरणादाखल दिलेल्या प्रकरणाशिवाय उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये. अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल."*

(7) *English version of the question shall be authentic in case of any type of any ambiguity.*

(७) *कोणत्याही प्रकारच्या संदेहाच्या स्थितीत, इंग्रजी भाषांतर अधिकृत समजले जाईल.*

(8) *All questions can be attempted only in one language either in English or in Marathi as per option given in application form.*

(८) *उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पर्यायानुसार सर्व प्रश्नांची उत्तरे मराठी किंवा इंग्रजी यापैकी एकाच भाषेत लिहिली पाहिजेत.*

---

**1.** Write a judgment on the basis of the facts leading to dispute as narrated below either in Set 'A' or 'B'. 20

खाली नमुद केलेल्या संच 'अ' किंवा 'ब' यापैकी कोणत्याही एका वादविषयाच्या घटनांवर आधारीत न्यायनिर्णय लिहा.

**Note :**

(1) Frame proper issues on the basis of the pleadings of the parties.

(2) Adhere to the contents of judgment as required under the Code of Civil Procedure.

(3) Wherever necessary you may exercise discretion in filling up details while appreciating evidence in the judgment.

(4) Give logical, legal and proper reasons in support of your findings and conclude the judgment with a proper operative order.

(१) पक्षकारांच्या वादविषयासंदर्भातील कथनावर आधारीत योग्य ते वादप्रश्न काढा.

(२) दिवाणी आचार संहितेत अभिप्रेत असलेल्या मसुद्याप्रमाणेच न्यायनिर्णय लिहा.

(३) न्यायनिर्णयात पुराव्याचे मुल्यमापन/विवेचन करतेवेळी तुमच्या कल्पनेनुसार आवश्यक त्या तपशीलवार घटनांची भर घाला.

(४) तुमच्या निष्कर्षांच्या पुष्ट्यर्थ तर्कसंगत, कायदेशीर व योग्य कारणे लिहा. तसेच योग्य आणि परिणामकारक अंतिम आदेश लिहून न्यायनिर्णयाचा शेवट करा.

LatestLaws.com

**SET A**

It is the case of the plaintiff that defendant nos. 1 and 2 are the owners of the suit-land bearing block no. 100, admeasuring 2 hectares, situated within the local limits of village Takli, Taluka and District Ahmednagar. The defendants gave the suit-land to the plaintiff for cultivation on crop-share basis for a period of 5 years i.e. from 1991-92 to 1995-96 by executing a 'Batai-patra' in his favour on 20.04.1991. The plaintiff was put in possession of the suit-land. He continued to be in possession of the suit-land even after the expiry of the period of five years. The defendants restrained the plaintiff from cultivating the suit-land on 15.09.1998. It is the contention of the plaintiff that he is in lawful and settled possession of the suit-land and that the defendants cannot dispossess him therefrom without due process of law. The plaintiff, therefore, filed the suit seeking the relief of perpetual injunction to restrain the defendants from disturbing his possession over the suit-land without due process of law.

The defendants filed written statement and opposed the claim of the plaintiff. They denied that they have delivered possession of the suit-land to the plaintiff for cultivation on crop-share basis, as claimed by him. They denied execution of 'Batai-patra' in favour of the plaintiff. According to them they are actually cultivating the suit-land and that the plaintiff is their agricultural-labourer. They were paying labour charges to the plaintiff. According to them, the plaintiff cannot seek the equitable relief of injunction against them since they are the rightful owners of the suit-land. On these grounds, they prayed that the suit may be dismissed with costs.

**संच 'अ'**

वादीचे कथन असे आहे की, दावा-जमिन गट क्र. १००, क्षेत्र २ हेक्टर, मौजे टाकळी, तालुका व जिल्हा अहमदनगर येथील असून प्रतिवादी क्र. १ व २ हे तिचे मालक आहेत. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिनांक २०.०४.१९९१ रोजी वादीच्या हक्कात एक 'बटाई-पत्र' लिहून दिले आणि त्यानुसार त्यास दावा-जमिन ५ वर्षासाठी, म्हणजे सन १९९१-९२ पासून १९९५-९६ पर्यंत, पीकात हिस्सा घेण्याच्या बोलीने कसण्यासाठी दिली. वादीस दावा जमिनीचा प्रत्यक्ष ताबा देण्यात आला. पाच वर्षांचा कालावधी पुर्ण झाल्यानंतरही दावा-जमिन वादीच्याच ताब्यात राहीली. प्रतिवादींनी दिनांक १५.०९.१९९८ रोजी वादीस दावा-जमिन कसण्यास प्रतिबंध केला. वादीचे कथन असे आहे की दावा जमिनीवर त्याचा कायदेशीर व प्रस्थापित ताबा असल्याने योग्य ती कायदेशीर प्रक्रिया अवलंबिल्याशिवाय प्रतिवादी दावा जमिनीचा ताबा त्याच्याकडून काढून घेऊ शकत नाहीत. या कथनांच्या आधारावर वादीने दावा दाखल करून प्रतिवादींनी योग्य त्या कायदेशीर प्रक्रियेशिवाय दावा जमिनीवरील आपल्या ताब्यास हरकत-अडथळा करू नये असा कायमस्वरूपी मनाईहुकुम प्रतिवादींविरूद्ध मिळावा अशी मागणी केलेली आहे.

प्रतिवादींनी कैफियत दाखल करून वादीच्या मागणीस विरोध केला आहे. वादीने कथन केल्याप्रमाणे त्यांनी वादीस दावा-जमीन पीकात हिस्सा घेण्याच्या बोलीने कसण्यासाठी त्याच्या ताब्यात दिली आहे ही बाब त्यांनी नाकारली आहे. वादीच्या हक्कात बटाई-पत्र लिहून दिल्याचेही त्यांनी नाकारले आहे. त्यांचे कथन असे आहे की प्रत्यक्षात ते दावा-जमिन कसीत आहेत आणि वादी हा त्यांचा शेतमजूर आहे. ते वादीला शेतमजूरीची



LatestLaws.com

रक्कम देत होते. त्यांचे कथन असेही आहे की ते दावा जमिनीचे न्याय्य मालक असल्याने वादीस त्यांच्याविरूद्ध मनाईहुकुमासारखी समन्याय दाद मागता येणार नाही. या कारणांस्तव दावा खर्चासह रद्द कावा अशी प्रतिवादींनी मागणी केलेली आहे.

**OR/किंवा**

**SET B**

It is the case of the plaintiff that the defendant agreed to sell to him the suit-house bearing House No. 456, situated within the Municipal limits of Saswad for a consideration of ₹ 80,000/- by executing an agreement on 07.07.1979. The defendant received ₹ 10,000/- as earnest money. The sale deed was to be executed within 3 months and the balance amount was to be paid at that time. The defendant received the further sum of ₹ 20,000/- from the plaintiff on 10.09.1979 and acknowledged the receipt thereof under his signature. He further confirmed in writing about receipt of total amount of ₹ 30,000/- from the plaintiff. The defendant did not execute sale deed despite repeated requests made by the plaintiff. The plaintiff sent a notice dated 05.11.1979 to the defendant, expressed his readiness and willingness to pay the balance amount of ₹ 50,000/- and called upon the defendant to execute sale deed within 7 days from the date of receipt of the notice. The defendant received that notice, but neither replied to it nor complied with it. Hence, the plaintiff filed the suit for specific performance of contract of sale, for possession of the suit-house and for future mesne profits. He specifically pleaded that he has always been ready and willing to perform his part of the contract.

The defendant filed written statement and resisted the claims of the plaintiff. He stated that his signature was obtained on a blank paper, which has been used to create a false agreement of sale. He further stated that a contract of sale is bilateral in nature under which, both, the vendor and vendee have rights and obligations. Therefore, it has to be signed by both the parties. He stated that the agreement dated 07.07.1979 has not been signed by the plaintiff (i.e. the vendee). Therefore, it is neither a complete nor a valid agreement. Consequently, the plaintiff is not entitled to enforce the same. On these grounds, the defendant prayed for dismissal of the suit with costs.

**Evidence of the parties**

To prove genuineness of the agreement, the plaintiff examined himself as a witness, one Shankar who was the scribe of the agreement and one Jagdish, before whom the agreement was entered into. He further produced and proved the receipt dated 10.09.1979 whereby the defendant acknowledged receipt of ₹ 20,000/- and confirmed receipt of total amount of ₹ 30,000/-.

As against him, the defendant examined himself only as a witness to deny the claims of the plaintiff.

LatestLaws.com

**Submissions on behalf of the plaintiff in respect of validity of the agreement**

The learned counsel for the plaintiff submitted that when an oral agreement to sell is valid, a written agreement signed by the vendor alone and delivered to the vendee, who, in turn, accepted it, would be a valid contract.

**Submissions on behalf of the defendant**

The agreement signed by the vendor alone would not be valid and enforceable.

**संच 'ब'**

वादीचे कथन असे आहे की, दाव्यातील घर क्र. ४५६, जे सासवड नगरपरीषदेच्या हद्दीत आहे, ते प्रतिवादीने त्यास दिनांक ०७.०७.१९७९ रोजी लिहून दिलेल्या करारनाम्यानुसार ₹ ८०,०००/- या किंमतीस विकण्याचे कबुल केले होते. प्रतिवादीने इसारा म्हणून ₹ १०,०००/- घेतलेत. खरेदीखत तीन महिन्यांच्या आत लिहून द्यावयाचे होते व त्यावेळी राहीलेली रक्कम अदा करावयाची होती. प्रतिवादीने वादीकडून दि. १०.०९.१९७९ रोजी आणखीन ₹ २०,०००/- घेतलेत व त्याच्या सहीनिशी सदर रक्कम मिळाल्याचे लिहुन दिले. वादीकडून एकुण ₹ ३०,०००/- मिळाल्याचेही मान्य व कबुल असल्याचे त्याने लिहुन दिले. वादीने अनेकदा विनंत्या करूनही प्रतिवादीने खरेदीखत लिहून दिले नाही. वादीने दि. ०५.११.१९७९ रोजी प्रतिवादीस नोटीस पाठवून आपण बाकी राहीलेली रक्कम ₹ ५०,०००/- देणेस तयार व इच्छुक असून नोटीस मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत खरेदीखत लिहून द्यावे, असे कळविले. प्रतिवादीस ती नोटीस मिळाली परंतु त्याने तिस उत्तरही दिले नाही किंवा तिचे पालनही केले नाही. त्यामुळे वादीने विक्री करारनाम्याची अंमलबजावणी व्हावी, दाव्यातील घराचा ताबा मिळावा व पुढील दरम्यानचे उत्पन्न मिळावे यासाठी प्रतिवादीविरूद्ध दावा दाखल केला. आपण करारनाम्यातील आपल्या हिश्याच्या भागाचे/अटींचे पालन करण्यास सदैव तयार व इच्छुक असल्याचे वादीने दाव्यात स्पष्टपणे नमुद केले.

प्रतिवादीने कैफियत दाखल करून वादीच्या मागण्यांना विरोध दर्शविला. त्याचे कथन असे की, त्याची सही एका कोऱ्या कागदावर घेण्यात आली असून त्याचा खोटा विक्रीचा करारनामा तयार करण्यासाठी गैरवापर करण्यात आलेला आहे. त्याचे कथन असेही आहे की, विक्रीचा करार हा उभयपक्षी करार असल्याने त्यानुसार विक्रेता व खरेदीदार या दोघांसाठीही काही हक्क व कर्तव्ये/बंधनेनिर्माण होतात. त्यामुळे विक्रीकरार हा त्या दोघांनीही स्वाक्षरांकित केला पाहीजे. प्रतिवादीचे कथन असे आहे की, दि. ०७.०७.१९७९ रोजीच्या करारनाम्यावर वादीची सही नाही. त्यामुळे तो पुर्ण तसेच विधीग्राह्य नाही. परिणामी, वादी त्या करारनाम्याची अंमलबआवणी करून घेऊ शकत नाही. या कारणांस्तव दावा खर्चासह रद्द कावा अशी प्रतिवादीची मागणी आहे.

**पक्षकारांचा पुरावा**

करारनाम्याचा खरेपणा सिद्ध करण्यासाठी वादीने स्वतःस साक्षीदार म्हणून तपासले तसेच करारनामा लिहीणारा नामे 'शंकर' आणि ज्याच्यासमोर करार ठरला तो 'जगदीश' यांनाही तपासले. दि. १०.०९.१९७९ रोजी वादीकडून ₹ २०,०००/- घेतल्याचे व एकुण रक्कम ₹ ३०,०००/- मिळाल्याचे कबुल व मान्य असल्याचे प्रतिवादीने लिहुन दिल्याबाबतची पावतीही वादीने हजर केली व सिद्ध केली.

प्रतिवादीने वादीचे दाव्यातील कथन व मागण्या नाकारण्यासाठी केवळ स्वतःलाच साक्षीदार म्हणून तपासले.



LatestLaws.com

**करारनाम्याच्या वैधतेविषयी वादीतर्फे करण्यात आलेल युक्तिवाद**

वादीच्या वकीलांचे प्रतिपादन असे की, जेंव्हा की तोंडी विक्रीचा करारनामासुद्धा विधीग्राह्य असतो, तेंव्हा केवळ विक्रेत्याने सही केलेला, खरेदीदाराच्या सुपुर्द केलेला व खरेदीदाराने स्विकारलेला लेखी करारनामा निश्चितपणे विधीग्राह्य असेल.

**प्रतिवादीतर्फे युक्तिवाद**

केवळ विक्रेत्याने सही करून दिलेला करारनामा विधीग्राह्य व अंमलबजावणी-योग्य राहणार नाही.

---

2. Write notes on any ***four*** of the following : 16
खालीलपैकी कोणत्याही ***चार*** संदर्भात टिपा लिहा :

(a) Compromise of suit
(अ) दाव्याची आपसात तडजोड

(b) Supplemental proceedings
(ब) पूरक कारवाई प्रक्रिया

(c) Interest
(क) व्याज

(d) Arrest before judgment
(ड) न्यायनिर्णयापूर्वीची अटक

(e) Procedure on parties defying orders of Court and committing breach of undertaking to Court
(इ) पक्षकारांनी न्यायालयाच्या आदेशांची अवगणना/अवमानना केल्यास तसेच न्यायालयास दिलेल्या वचनाचा भंग केल्यास अवलंब करण्याची पद्धत

---

3. Write notes on any ***four*** of the following : 16
खालीलपैकी कोणत्याही ***चार*** संदर्भात टिपा लिहा :

(a) Personal bars to the relief of specific performance of a contract
(अ) कराराच्या विनिर्दिष्ट पालनाच्या मार्गातील वैयक्तिक प्रतिबंध

(b) The persons entitled to obtain specific performance
(ब) कराराचे विनिर्दिष्ट पालनाचे हक्क असलेल्या व्यक्ति

(c) Suit under the Specific Relief Act by a person dispossessed of immovable property
(क) अचल मालमत्तेच्या कब्जातून बेदखल झालेल्या व्यक्तिचा विनिर्दिष्ट अनुतोष कायद्याखालील दावा

(d) Condition and warranty
(ड) प्रमुख शर्त/अट आणि आश्वासन (दुय्यम शर्त/अट)

(e) Rights of unpaid seller of goods
(इ) मालाच्या अदत्तविक्रेत्याचे अधिकार

---

LatestLaws.com

**4.** Write notes on any ***four*** of the following : 16
खालीलपैकी कोणत्याही ***चार*** संदर्भात टिपा लिहा :

(a) Quasi-contracts
(अ) आभासी करार
(b) Contingent contracts
(ब) घटनावलंबी करार
(c) Unlawful considerations/objects of an agreement
(क) कराराचे बेकायदेशीर प्रतिफल/हेतु
(d) Rights and liabilities of a minor partner
(ड) अज्ञान भागीदाराचे अधिकार व जबाबदाऱ्या
(e) Procedure for registration of a partnership firm
(इ) भागीदारी संस्थेच्या नोंदणीची पद्धत

---

**5.** Write notes on any ***two*** of the following : 16
खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** संदर्भात टिपा लिहा :

(a) Right to lodge caveat and the caveat rules framed by the Bombay High Court
(अ) सावधानपत्र दाखल करण्याचा अधिकार व मुंबई उच्च न्यायालयाने तयार केलेले सावधानपत्राचे नियम
(b) Modes of paying money under decree
(ब) हुकुमनाम्यानुसार पैसे भरणा करण्याच्या पद्धती/मार्ग
(c) Res-judicata and constructive Res-judicata
(क) प्राङ्न्याय आणि अर्थापन्न प्राङ्न्याय

---

**6.** Answer any ***two*** of the following : 16
खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) What is meant by "Transfer of property" ? What property can and what property cannot be transferred ?
(अ) "मालमत्तेचे हस्तांतरण" म्हणजे काय ? कोणती मालमत्ता हस्तांतरीत करता येते व कोणती मालमत्ता हस्तांतरीत करता येत नाही ?
(b) What is meant by "Sale" of immovable property ? What are the liabilities of a seller of immovable property before and after completion of the sale ?
(ब) स्थावर मालमत्तेची "विक्री" म्हणजे काय ? स्थावर मालमत्तेच्या विक्रेत्याच्या विक्री पुर्ण होण्यापूर्वी व त्यानंतरच्या जबाबदाऱ्या कोणत्या ?
(c) Explain fully the doctrine of 'Lis Pendens'.
(क) 'प्रलंबित वाद' तत्वाचे सविस्तर विवेचन करा.

---

LatestLaws.com

दिवाणी न्यायाधीश (क.स्त.) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग)

मुख्य परीक्षा - २०१०

ATN

**2010** परीक्षा दि. १९ डिसेंबर, २०१०

**२०१०**

**PAPER – II**

**पेपर क्रमांक – २**

# Indian Penal Code, Evidence Act, Code of Criminal Procedure, Essay on Current Legal Topic

# इंडियन पिनल कोड, एव्हीडन्स ॲक्ट, कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर, करंट लिगल टॉपिकवरील निबंध

**Time : 3 Hours** | **Max. Marks : 100**
**वेळ : ३ तास** | **गुण : १००**

**N.B. :**
**सूचना :**

*(1) Question Nos. 12 and 13 are **compulsory**.*

*(१) प्रश्न क्रमांक १२ व १३ **अनिवार्य** आहेत.*

*(2) Answer any **six** from the remaining questions.*

*(२) उर्वरित प्रश्नांमधून कोणतेही **सहा** प्रश्न सोडवावेत.*

*(3) Marks to each question are indicated by figure in the margin on right hand.*

*(३) प्रश्नासमोरील उजव्या बाजूच्या समासातील अंक गुण दर्शवितात.*

*(4) Number of optional question upto the prescribed number in the order in which questions have been solved, will only be assessed and excess answers of the question/s will not be assessed.*

*(४) ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात त्या क्रमाने अपेक्षित प्रश्नसंख्येइतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरित अतिरिक्त ठरणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

*(5) Do not reproduce any question. Write only question's number against the answer.*

*(५) उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्न पुन्हा लिहू नयेत. फक्त प्रश्न क्रमांक नमूद करुन उत्तर लिहावे.*

P.T.O.

LatestLaws.com

(6) "Other than cited cases, candidate should not write roll number, any names (including their own), signature, address or any indication of their identity anywhere inside the answer book otherwise he will be penalised."

(६) "उदाहरणदाखल दिलेल्या प्रकरणांशिवाय उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये. अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल."

(7) English version of the question shall be authentic in case of any type of any ambiguity.

(७) कोणत्याही प्रकारच्या संदेहाच्या स्थितीत, इंग्रजी भाषांतर अधिकृत समजले जाईल.

(8) All questions can be attempted only in one language either in English or in Marathi as per option given in application form.

(८) उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पर्यायानुसार सर्व प्रश्नांची उत्तरे मराठी किंवा इंग्रजी यापैकी एकाच भाषेत लिहिली पाहिजेत.

---

**1.** Explain procedure regarding trial of a Summons case. 10

न्यायदंडाधिकारी यांनी समन्स खटल्याच्या संपरीक्षेसाठी अंगीकारणेची पद्धत स्पष्ट करा.

---

**2.** Write notes on any ***two*** : 10

टिपालिहा-कुठल्याही ***दोन*** :

(A) Magistrate's powers of imposing sentences

(अ) न्यायदंडाधिकारी यांना असलेले शिक्षा देण्याचे अधिकार

(B) Detention of accused in custody during investigation of crime

(ब) गुन्हयांचे अन्वेषण काळात आरोपीस हवालतीत स्थानबद्ध करणे

(C) Grant of bail in cases of bailable and non-bailable offences by a Court other than High Court or Sessions Court

(क) उच्च न्यायाल्य व सत्र न्यायालय यांखेरीज अन्य न्यायालयां कडुन जामिनपात्र व अजामिनपात्र गुन्हयांत मंजुरकेला जाणारा जामिन

(D) Cognizable and non-cognizable offences

(ड) दखलपात्र व अदखलपात्र गुन्हे

---

LatestLaws.com

3. (a) How a Magistrate of the first class can take cognizance of any offence ?

(b) How and when a Magistrate of the first class can issue process in a private complaint ? 5+5=10

(अ) न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांना अपराधांची दखल कशी घेता येते ?

(ब) न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग हे केव्हा आणि कशा प्रकारे खाजगी तक्रार प्रकरणात आदेशिका काढु शकतात ?

---

4. Write notes on any ***two*** : 10

टीपा लिहा-कुठल्याही ***दोन*** :

(A) Assault and Criminal force

(अ) हमळा आणि फौजदारीपात्र बलप्रयोग

(B) Robbery and Dacoity

(ब) जबरी चोरी आणि दर वड़ा

(C) Kidnapping and Abduction

(क) अपनयन आणि अपहरण

(D) Abetment and Criminal conspiracy

(ड) अपप्रेरणा आणि फौजदारी कट

---

5. What is culpable homicide ? Explain when it amounts to murder and when it does not amount to murder. 10

सदोष मनुष्यवध म्हणजे काय ? सदोष मनुष्यवध केंव्हा 'खून' असू शकतो व केंव्हा असू शकत नाही याचे स्पष्टीकरण करा.

---

6. Discuss provisions regarding cruelty to a woman by her husband or his relatives and abetment by them to commit suicide. 10

एखाद्या स्त्रीच्या पतीने कींवा त्याच्या नातेवाईकांनी तीला क्रूर वागणूक देणे आणि तीला आत्महत्या करणेस अपप्रेरीत करणे यासंबंधीच्या तरतुदींचे विवेचन करा.

---



LatestLaws.com

7. Write notes on any ***two*** : 5+5=10

टिपा लिहा-कुठल्याही ***दोन*** :

(A) Admission and Confession

(अ) कबुली आणि कबुली जबाब

(B) Public Document

(ब) सार्वजनिक दस्तऐवज

(C) Use of previous statement in writing of a witness during the trial

(क) साक्षीदारा ने पुर्वी केलेल्या लेखी कथनांचा संपरीक्षेत होणारा उपयोग

(D) Estoppel

(ड) प्रतिष्टंभ

---

8. Explain the provisions relating to admissibility of oral evidence at variance with the terms of a contract in between the parties reduced into writing by them. 10

उभय पक्षांनी त्यांचेतीळ कराराच्या अटी लेखी दस्तऐवजाचे स्वरूपात नमूद केव्या असताना त्यांचेशी विसंगत कींवा वेगळया स्वरूपाच्या तोंडी पुराव्याच्या स्वीकृतीबाबत असलेल्या तरतुदींचे स्पष्टीकरण करा.

---

9. What is presumption ? State the provisions regarding presumption as to abetment of suicide by a married woman and dowry death of a married woman. 10

गृहीत्तक म्हणजे काय ? विवाहीत स्त्रीला आत्महत्या करण्यास अपप्रेरणा देण्या संबंधीचे तसेच विवाहीत स्त्रीच्या हुंडाबळी संबंधी असलेल्या गृहीतकांच्या तरतुदी स्पष्ट करा.

---

10. Discuss the provisions relating to grant of maintenance under the Code of Criminal Procedure, 1973. 10

फौजदारी प्रक्रीया संहीता, १९७३ यांतील निर्वाहासंबंधीच्या तरतुदींचे विवेचन करा.

---

11. (a) What is primary and secondary evidence ? When is the secondary evidence admissible ?

(b) How the execution of a document can be proved ? 10

(अ) अव्वल पुरावा आणि दुय्यम पुरावा म्हणजे काय ? दुय्यम पुरावा केंव्हा देता येतो ?

(ब) एखादा दस्तऐवज कसा शाबित करता येतो.

---

LatestLaws.com

12. Write an essay on any ***one*** of the following : 20

(a) Child Labour in Indian Society

(b) White Collared Crime – Cyber Crime

निबन्ध लीहा कुठल्याही ***एका*** विषयावर :

(अ) बाल कामगार – भारतीय समाजातील

(ब) सायबर गुन्हेगारी – प्रतिष्ठीत गुन्हेगारी

---

13. Write Judgement on the following facts : 20

Narmada, the wife of accused no. 1 was living with her brother Gangaram because of the estrangement between the spouses. Cases against each other were pending in the courts. On the date of incident at 10 a.m. she alongwith her brother and his wife Chameli was taking cattle to the river. Accused no. 1 obstructed them and asked Narmada to come with him. She refused. A1 got annoyed and gave blows on her hand with iron bar. At that moment four brothers of the accused no. 1 (A2 to A5) joined him. A2 gave axe blow on the right leg of Gangaram causing compound fracture to him. A3 assaulted Chameli by giving fist and kicks blows to her. All the five accused then went to the hut in the field of the uncle of Gangaram, named Bangdu where all of them assaulted Bangdu by entering into the hut and gave fists and kicks blows to him. Bangdu lodged report in the Police Station at 8 p.m. on the same day.

At the trial injured persons stated the incident as it is. Out of the four eye-witnesses, the adjoining field owners, two supported the prosecution case and two turned hostile. Injuries were proved by the Doctor who examined them but the X-ray report was not proved as the X-ray technician was not examined. Defence of the accused is of total denial.

खालील तथ्यांवर आधारीत निकाळपत्र लीहा :

नर्मदा म्हणजे आरोपी नं. 1 यांची पत्नी जी तीन वर्षापासून आ.नं. १ व तीच्यात वाद झाल्यामुळे भाउ गंगाराम यांचेकडे रहात होती व त्या दोघामध्ये न्यायालयात प्रकरणेही प्रविष्ट होती अशी घटनेचे दिवशी भाउ गंगाराम व चमेली यांचे सोबत सकाळी १० वजता गुरे घेवून नदीकडे जात होती. वाटेत आ.नं. १ याने त्यांना अडविले आणि आरोपी नं. १ हयाने नर्मदा होस तीच्या सोबत नांदण्यास यावे म्हणून सांगीतले. नर्मदाहीने नकार दीला त्यावर आ.नं. १ याने चिडुन जावून तीच्या हातावर लोखंडी सळीने फटके मारले. त्याच वेळी आ.नं. १ चे चार भाउ (आ. २ ते आ. ५) हे देखील तेथे आले व त्यांतील आ. २ याने हातातील कुऱ्हाडीने गंगारामचे उजवे पायावर वार केले त्यामुळे त्याच्या उजव्या पायाच्या पोटरीची हाडे मोडली आ.नं. ३ याने चमेलीवर हल्ला करुन तीला लाथाबुक्क्यांनी मारले नंतर हे पाचही आरोपी गंगारामचे काका बांगडु यांचे जवळच असलेल्या शेतातील झोपडीत शिरले आणि तेथे त्यांनी बांगडु यांचेवर लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन हल्ला केला. बांगडु यांनी त्याच दीवशी संध्याकाळी ८ वाजता फीर्याद पोलीस स्टेशनल दीली.



LatestLaws.com

कोर्टापुढे सर्व जखमी इसमांनी घटनेप्रमाणे सांगीतळे. शेजारचे शेतमालकांपैकी चार प्रत्यक्षदर्शी सांक्षीदारांपैकी दोन जणांनी फीर्यादीपक्षास साथ दीली तर दोन साक्षीदार फीतूर झाले व त्यांनी काहीही पूरक सांगीतले नाही. डॉक्टर ज्यांनी जखमींना तपासून प्रमाणपत्रे दीली होती त्यांनी जखमा झाल्याचे सांगीतले तरी 'क्ष'-किरण अहवाल शबित होवू शकल नाही कारण 'क्ष'-किरण तज्ञ तपासले गेले नाहीत. आरोपींनी संपूर्ण नकारात्मक बचाव घेतला.

---

LatestLaws.com